ePaper
दसरा मेळावा: अनिल परब यांचे शिंदे गटाला थेट आव्हान



| वर्ष - 7 | अंक - 166 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- बीस सालका इतिहास बदला!
- पाकिस्तान संघाच्या वाढल्या अडचणी!
- नेपाळमध्ये 6.1 रिश्टर स्केलचा भूकंप
- टोकाचं पाऊल उचलू नका!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 23 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# रावेत उड्डाणपुलाला 'मुहूर्त'!

## नवीन वर्षांत नागरिकांची सुविधा : जागेचा ताबा नसल्याने आठ वर्षे रखडले होते काम

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या आठ वर्षांपासून रखडलेल्या रावेत येथील उड्डाणपुलाच्या कामाला अखेर मुहूर्त मिळाला आहे. जागेचा ताबा नसल्याने हे काम रखडले होते. सध्या उर्वरीत प्रक्रिया पुर्ण झाली आहे. त्यानुसार या कामाला गती मिळाली आहे. येणाऱ्या नवीन वर्षामध्ये हा पुल वाहतुकीस खुला होईल, असे सांगण्यात येत आहे.**

रावेत येथे एकूण 165 मीटर लांबीचा उड्डाणपुल तयार करण्यात येत आहे. हे काम डिसेंबरअखेरपर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. पुल झाल्याने निगडीच्या भक्ती-शक्ती समुह शिल्प चौक ते किवळे या 5.1 किलोमीटर अंतराच्या बीआरटी मार्गावरून जानेवारी 2024 पासून वाहतुक सुरू होईल.

दरम्यान, पुलाखालून रस्त्याचे काम सुरू आहे. तेथील कच्चा रस्त्यावरून दुचाकी व तीनचाकी वाहनांची वाहतुक सुरू झाली आहे. मध्यंतरी जागा ताब्यात नसल्याने आठ वर्षापासून या उड्डाणपुलाचे काम रखडले होते. न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निकाल दिल्यानंतर उर्वरित काम एप्रिल 2023 पासून सुरू करण्यात आले. येणाऱ्या नवीन वर्षामध्ये हा पुल वाहतूकीस सुरू होणार आहे.



### ... निगडी ते किवळे वाहतूक होईल सुरळीत

दरम्यान, हा पूल पूर्ण झाल्यानंतर मात्र किवळे भागात केवळ रस्ता आहे. तेथे बीआरटीएसचे बॅरिकेट्स, बस थांबे, पदपथ नाहीत. तसेच, सुमारे 60 मीटरचा रस्ता कच्चा आहे. त्यामुळे निगडीवरून वेगात आलेली वाहने येथे अडकून वाहतुक संथ होण्याची शक्यता आहे. वाहनांना ब्रेक बसणार आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पुल तयार झाल्यामुळे पुलाच्या कामासोबतच रावेत ते किवळे या 3 किलोमीटर अंतराच्या बीआरटी रस्त्याचे काम पुर्ण करणे गरजेचे आहे. त्यामुळे वाहतुकीस नव्याने अडथळा निर्माण झाला नसता. निगडीपासून किवळेपर्यंत रहदारी विनाअडथळा पोहचली असती असे सांगण्यात येत आहे.

# दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर झेंडूच्या फुलांनी बाजाराला आली बहर

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

विजयादशमी अर्थात दसरा या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर (Pimpri Chinchwad)शहरातील मुख्य बाजारपेठांमध्ये झेंडूच्या फुलांची मोठी आवक झाली असून, रंगीबेरंगी फुलांनी बाजार बहरले आहे. सर्वत्र खरेदीसाठी लोकांनी मोठ्या संख्यने गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळाले. यावेळी चांगली मोठी झेंडूची केशरी व पिवळ्या रंगाच्या फुलांना 100 ते 150 रुपये किलोचा भाव मिळाला. शहरातील पिंपरी, चिंचवड, चिखली, भोसरी, निगडी सांगवी अशा भागांमध्ये झेंडूच्या फुलांची मोठमोठी दुकान रस्त्यावर थाटल्याचे पाहायला मिळाले. आंब्याची, अशोकाची, केळीची पाने, विविध जमातीची फुले विक्रीसाठी बाजारात आली आहेत. त्यामुळे बाजाराला बहर आल्याचे चित्र पहायला मिळाले. घराच्या दारांना लावायची तोरणं, झुंबर, प्रकाशदिवे खरेदीसाठी लोकांनी मोठी गर्दी केली. कापड बाजारात कपडे खरेदी करण्यासाठी लोकांनी मोठी गर्दी केली. दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर वाहनांची खरेदी देखील मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. त्यासाठी वाहन निर्मिती कंपन्यांकडून मोठ्या ऑफर्स ठेवण्यात आल्या आहेत. ऐन सणासुदीच्या दिवसात सोने चांदीचे भाव वधारले असताना देखील दागिने खरेदीसाठी लोकांनी पसंती दर्शविल्याचे पाहायला मिळाले.

# विद्यार्थ्यांना स्कॉलरशीपची पुस्तके मिळेना!

## जुन्या पुस्तकांवर शिकवणीची मदार : महापालिका शाळांची अवस्था

। पिंपरी । महाईन्यूज ।

**फेब्रुवारी- २०२४ मध्ये होणाऱ्या स्कॉलरशिप परिक्षेच्या अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना वेळेत पुस्तके उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने नवीन पुस्तके वेळेत दिली जात नाहीत. परिणामी शिक्षकांना जुन्याच पुस्तकांचा आधार घेऊन विद्यार्थ्यांना शिकवावे लागत आहे. विलंबाने मिळणाऱ्या पुस्तकांचा नेमका उपयोग काय? असा प्रश्न विद्यार्थी आणि पालक उपस्थित करत आहेत.**




स्कॉलरशीपची पुस्तके परीक्षेच्या तोंडावर मिळत असल्याने शाळेतील शिक्षक मागील वर्षातील मुलांची पुस्तके जमा करुन ठेवत आहेत. पुढच्या वर्षीच्या मुलांना शिकविण्यासाठी त्याचा वापर केला जात आहे. जुन्या पुस्तकातून शिकवून विद्यार्थ्यांना जमा केलेल्या पुस्तकांचे वाटप केले जात आहे. मात्र, काही वेळेला मुले जास्त असली तर पुस्तके सर्वांच्या वाट्याला येत नाही. परिणामी पुस्तकांची आदलाबदल करुन शिकविण्याची वेळ शिक्षकांवर येत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात येणारी इयत्ता पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी महिन्यात होते. दरवर्षी महापालिका शाळेतील सुमारे पाच ते सहा हजार विद्यार्थी परीक्षेला बसतात. मात्र, पुस्तकांच्या खरेदीसाठी शिक्षण विभागाकडून अद्याप निविदाच पाठविली नाही. त्यामुळे अर्धे शैक्षणिक वर्ष संपले तरी विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके पडली नाहीत असे चित्र आहे.

### मुले अभ्यास कधी करणार?

शाळेतील स्कॉलरशीपची परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांची भविष्यातील स्पर्धा परीक्षेची तयारी असते. या स्पर्धा परीक्षांमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावे ही पालकांची आणि शिक्षकांची देखील इच्छा असते. मात्र, या परिक्षेच्या तयारीसाठी आवश्यक पुस्तकांच्या खरेदीसाठी शिक्षण विभागाकडून उशीर केला जात आहे. त्यामुळे पुस्तके मिळणार कधी आणि मुले अभ्यास करणार कधी? असा प्रश्न पालक विचारत आहेत.

# बस डेपो आणि पार्किंगसाठी पीएमआरडीएकडे जागेची मागणी!

## » राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचे परखड भाष्य

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) डेपो व बस पार्किंगसाठी आवश्यक असलेल्या आणि सध्या वापरात असलेल्या तीन जागा देण्याची मागणी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडीए) केली आहे. या जागा मिळाल्यास पीएमपीकडून लाखांमध्ये दिले जाणार भाडे वाचणार आहे.**



पुणे, पिंपरी चिंचवड आणि पुणे महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडी) हद्दीत पीएमपीकडून सार्वजनिक सेवा दिली जाते. पीएमपीकडून पीएमआरडीए हद्दीत ११३ मार्गावर ४९० बसमार्फत सेवा दिली जाते. या सेवेच्या बदल्यात पीएमआरडीएने गेल्या वर्षी १०० कोटी रूपये दिले आहेत. पीएमपीकडून पीएमआरडीएच्या काही जांगाचा पार्कींग, डेपोसाठी वापर केला जात आहे. पण, बदल्यात पीएमपीला लाखो रूपयांचे भाडे पीएमआरडीएला द्यावे लागत आहे. त्यामुळे पीएमपीने मोशी, भोसरी आणि रावेत येथील जागा देण्याची मागणी पीएमआरडीएकडे केली आहे. या जागा पीएमपीला मिळाल्यास महिन्याला लाखो रूपये वाचणार आहेत. या मागण्यांवर पीएमआरडीएकडून विचार सुरू आहे. पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपीची सेवा मोठ्या प्रमाणात दिली जाते. अनेक नागरिक पीएमआरडीएच्या हद्दीत राहून नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने शहरात येतात. त्यामुळे पीएमपीच्या ४९० बस पीएमआरडीएच्या हद्दीत चालतात. भविष्यात पीएमआरडीच्या हद्दीत डेपो उभारणी करण्यात येणार आहेत. त्यासाठी नऊ ठिकाणी जागा देण्याची मागणी पीएमपीने केली आहे. एक जागा किमान पाच एकरपर्यंत असावी म्हणजे त्या ठिकाणाहून डेपो सुरू करणे शक्य होईल, असे म्हटले होते.

### महिन्याला लाखो रूपये वाचणार

» पीएमपीकडून पीएमआरडीएच्या काही जांगाचा पार्कींग, डेपोसाठी वापर केला जात आहे. पण, बदल्यात पीएमपीला लाखो रूपयांचे भाडे पीएमआरडीएला द्यावे लागत आहे. त्यामुळे पीएमपीने मोशी, भोसरी आणि रावेत येथील जागा देण्याची मागणी पीएमआरडीएकडे केली आहे. या जागा पीएमपीला मिळाल्यास महिन्याला लाखो रूपये वाचणार आहेत. या मागण्यांवर पीएमआरडीएकडून विचार सुरू आहे. पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपीची सेवा मोठ्या प्रमाणात दिली जाते. अनेक नागरिक पीएमआरडीएच्या हद्दीत राहून नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने शहरात येतात. त्यामुळे पीएमपीच्या ४९० बस पीएमआरडीएच्या हद्दीत चालतात. भविष्यात पीएमआरडीच्या हद्दीत डेपो उभारणी करण्यात येणार आहेत.

# शिका, नेतृत्व करा आणि बदल घडवा!

## » शरद पवार यांच्यासमोर दादांची टिप्पणी

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'शिका, नेतृत्व करा आणि बदल घडवा...' हे विद्या प्रतिष्ठानचे ब्रीदवाक्य आहे आणि ब्रीदवाक्यानुसारच आम्ही काम करत आहोत, अशी टिप्पणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासमोर केली तेव्हा सर्वांच्या भुवया उंचावल्या. विद्या प्रतिष्ठानच्या दौंड येथील अनंतराव पवार इंग्लिश मीडियम स्कूलच्या इमारतीचा उद्घाटन सोहळा शरद पवार, अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत झाला.**



### मी मोठ्या मतांनी विजयी : शरद पवार

» वयाच्या २६ व्या वर्षी मी पहिल्यांदा विधानसभा निवडणुकीसाठी उभा ठाकलो होते. त्यावेळी माझ्याविरोधात एका साखर कारखान्याने जोर लावला होता. त्यामुळे लढाई सोपी नव्हती. पण, काहींच्या मदतीने मी मोठ्या मतांनी विजयी झालो. त्यावेळी तात्यासाहेबांनी आणि आप्पासाहेबांनी मला पाठिंबा दिला. त्यांची मदत मी कधीही विसरु शकत नाही, अशा आठवणींना शरद पवार यांनी उजाळा दिला.

कोणतेही राजकीय भाष्य करण्याचे टाळून अजित पवार यांनी शरद पवार यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी संस्थेची प्रगती विषद केली. शरद पवार यांच्या समोरच त्यांनी कर्मचाऱ्यांना दम देऊन चांगले काम करण्याच्या सूचना केल्या. अजित पवार म्हणाले की, पवार साहेबांनी शेती क्षेत्रासाठी कृषी विकास प्रतिष्ठानची आणि शिक्षणाकरिता विद्या प्रतिष्ठानची स्थापना केली. पुणे आणि पुणे जिल्ह्यामध्ये या संस्थेचे मोठे जाळे आहे. इंदापूरमध्येही शाळेची शाखा सुरु झाल्याने ही इंग्रजी माध्यमाची शाळा आम्ही पवार साहेबांच्या माध्यमातून सुरू केली. अनंतराव पवार इंग्रजी माध्यम शाळेच्या इमारतीचे एक लाख चौरस फुटांचे बांधकाम झालेले आहे. अनंतराव पवार यांच्या नावाने ही शाळा आहे. त्यांच्या नावाला साजेसे शिक्षण येथे दिले गेले पाहिजे. जर कुणी कमी पडले तर माझ्याशी गाठ आहे. येथे शिक्षण घेणारा विद्यार्थी लाथ मारीन तिथे पाणी काढेल, असा घडला पाहिजे, असा दम अजित पवारांनी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना भरला. शरद पवार म्हणाले की, १९७२ साली संस्था काढली, सध्या संस्थेत ३२ हजार विद्यार्थी आहेत.

# साखर कारखान्याच्या मतदार यादीकडे लक्ष!

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

भवानीनगर (ता.इंदापूर) येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२३-२८ पंचवार्षिक निवडणूकीच्या अंतिम मतदार यादीकडे सभासदांसह जिल्हाचे लक्ष लागले आहे. श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची मुदत ११ मे २०२० रोजी संपली असून सुमारे साडेतीन वर्षापासून कारखान्याची निवडणूक रखडली आहे. आत्तापर्यंत कारखान्याची ३१ डिसेंबर २०१९ तसेच १२ जुलै २०२३ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध झाली होती. अंतिम मतदार यादीवरुन उच्च न्यायालयामध्ये दोन वेळा याचिका दाखल झाल्यामुळे होत्या. उच्च न्यायालयाच्या आदेशाने नव्याने तिसऱ्यांदा ६ ऑक्टोबर २०२३ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. यादीमध्ये 'अ' वर्गातील २२७७८ सभासदांचा तसेच 'ब' वर्गातील २९१ संस्थेच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. यादीवरती ४९५ हरकती घेण्यात आल्या होत्या. शुक्रवारी (ता. २०) रोजी हरकतींची सुनावणी पूर्ण झाली आहे. प्रादेशिक सहसंचालक (साखर) तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी हे २५ ऑक्टोबर पर्यंत अंतिम मतदार प्रसिद्ध करणार आहेत. छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांनी उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती. तिसऱ्यांचा प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादी उच्च न्यायालयाच्या फेऱ्यामध्ये अडकणार का ? याकडे कारखान्याच्या सभासदांसह पुणे जिल्हातील राजकीय पदाधिकाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# थकबाकी वसुलीची 'विजया दशमी'

## महापालिका तिजोरीत 605 कोटींचा गल्ला

### साडेसहा महिन्यात 65 टक्के मालमत्ता धारकांनी भरला कर

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने गेल्या दोन वर्षात कर वसुलीची नवं-नवीन विक्रम केले आहेत. यामध्ये वर्षानुवर्षे करदात्यांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी होती. हा थकीत कर वसूल करण्यात महापालिकेच्या कर संकलन विभागाला यश आले आहे. 2022-23 या आर्थिक वर्षात तब्बल साडेतीनशे कोटी तर 2023-24 या आर्थिक वर्षातील साडेसहा महिन्यात तब्बल 201 कोटी रुपयांची जुनी थकबाकी वसुली केली आहे. आत्तापर्यंत चालू आर्थिक वर्षात महापालिका इतिहासात प्रथमच 604 कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे.**





शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा 6 लाख 7 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभाग कर वसूल करत आहे. या विभागाच्या वतीने विविध उपक्रम, जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे यासह यंदा महिला बचत गटांच्या माध्यमातून बिलांचे घरपोच वाटप, रिक्षाव्दारे जनजागृती, महत्वाच्या चौकात होर्डिंग्ज, रिल्स स्पर्धा, सोशल मीडियाचा प्रभावी वापर याचबरोबर प्रत्येक व्यक्तीला त्याची मालमत्ता कराची रक्कम आणि सवलतीची रक्कम सांगणारा CUSTOMISED SMS पाठवला जात होता. अशा विविध बाबींमुळे 2023-24 च्या साडेसहा महिन्यात 604 कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात आला आहे. आता थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यासाठी तीव्र मोहीम हाती घेण्यात आली असून थकबाकीदार तत्काळ थकीत कर भरत आहेत.

शहरातील मालमत्ता धारकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी होती. थकबाकी वसूल होत नसल्याने दरवर्षी हा आकडे वाढतच होता. मात्र, या विभागाची जबाबदारी सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी थकबाकी वसुलीसाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुक्ष्म नियोजन, आराखडा तयार केला. त्यानुसार गेल्या दोन वर्षापासून थकबाकी वसूलीचा आलेख उंचावत आहे. थकबाकीदारांची चालू कर आणि थकीत कर भरण्याकडे कल वाढत असल्याने 2022-23 आणि 2023-24 मध्ये आतापर्यंत तब्बल 555 कोटी रुपयांची जुनी थकबाकी वसूल केली आहे. यामध्ये प्रामुख्याने निवासीसह बड्या थकबाकीदार बिगर निवासी मालमत्ता धारकांकडून कर वसूल केला आहे.

दरम्यान, महापालिकेच्या इतिहासात साडेसहा महिन्यात कर संकलन व कर आकारणी विभागाला 65 टक्के मालमत्ता धारकांचा 604 कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात यश आले आहे. उर्वरित साडेपाच महिन्यात 35 टक्के करदात्यांचा कर आणि थकीत कर वसुलीसाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.

### आकडे बोलतात

**»गेल्या तीन वर्षातील थकबाकी वसुलीचा वाढता आलेख**

| वर्ष | थकीत कर वसूल |
|---|---|
| 2021-22. | 269 कोटी |
| 2022-23. | 354 कोटी |
| 2023-24. (साडेसहा महिन्यात) | 201 कोटी |



"कर संकलन विभागास गतवर्षीच्या जप्त मालमत्तांचा लिलाव करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच शासनाच्या सातबारा संगणकीकरण धर्तीवर शहरातील मालमत्तांचा मालमत्ता उतारा करण्यात यावा यासाठी विशेष बैठक घेऊन निर्देश देण्यात आले आहेत. पालिकेची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी शक्य ते प्रयत्न केले जात आहेत.

**- शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका



"गेल्या आठवड्यात सर्व मंडल अधिकारी, प्रशासन अधिकारी यांची बैठक घेतली आहे. त्यात त्यांना अधिकाधिक पारदर्शी कामकाज कसे करता येईल याची कार्यप्रणाली ठरवून देण्यात आली आहे. तसेच जप्ती मोहीम कशा पद्धतीने राबवता येईल याचा कालबद्ध कार्यक्रम आखून देण्यात आला आहे. शहरात चालू असलेले सर्वेक्षण पालिकेच्या एकूण आर्थिक स्थितीबाबत क्रांतिकारी ठरणार असल्याने त्यात कुठल्या त्रुटी राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

**- प्रदीप जांभळे-पाटील,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका



"जप्ती मोहीम आणि सर्वेक्षण यांची निश्चित करून दिलेली लक्ष्ये साध्य करण्यासाठी विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी कटिबध्द आहेत. वर्षानुवर्षे थकीत असलेली रक्कम वसूल करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करण्यात येत आहे. आतापासूनच जप्ती मोहिमेने वेग घेतलेला असून या आर्थिक वर्षात सर्वाधिक थकबाकी वसूल करण्याचा आमचा प्रयत्न असेल.

**- नीलेश देशमुख,,** सहायक आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

---

# एकनाथ पवारांचा भाजपाला 'जय महाराष्ट्र'

## मराठा आरक्षणाला पाठिंबा : भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी भाजपच्या प्रदेश प्रवक्ते आणि प्राथमिक सदस्यत्व पदाचा राजीनामा देत ज्येष्ठ नेते एकनाथ पवार यांनी भाजपला जय महाराष्ट्र केला आहे. रविवारी (दि.२२) पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधताना एकनाथ पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोन मातब्बर मराठा नेत्यांवर निशाणा धला.**



एकनाथ पवार म्हणाले की, जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजातील युवक रस्त्यावर उतरून आंदोलन करीत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोघेही मराठा समाजाचे नेते असतानाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शेजारी बसून तमाशा बघण्याची भूमिका घेत आहेत. आपले न्याय हक्क मागणीसाठी रस्त्यावर उतरलेला महाराष्ट्रातील मराठा समाज त्यांना कदापि माफ करणार नाही. महाराष्ट्रात आणि केंद्रात भाजपची सत्ता असताना मी सत्तेचा कुठलाही लोभ न ठेवता राजीनामा देत आहे. माझी राजकीय भूमिका मी २७ तारखेला पुन्हा जाहीर करेल. जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी ९ सप्टेंबर रोजी पिंपरी चिंचवड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे पिंपरी चिंचवड शहर बंद असताना झालेल्या सभेत मी या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा जाहीर केला होता. त्याच वेळी मी भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा देऊन जरांगे पाटील यांच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेईल असे जाहीर केले होते, असे पवार म्हणाले. जरांगे पाटील यांनी सरकारला ४० दिवसांचा अल्टीमेटम दिला असतानाही सरकार वेळकाढू पणाची भूमिका घेत आहे. उरलेल्या दोन दिवसात आई तुळजाभवानी या सरकारला राज्यातील मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत निर्णय घेण्याची सद्बुद्धी देवो अशी प्रार्थना मी देवीचरणी करत असल्याचे एकनाथ पवार यांनी यावेळी सांगितले.

"मागील काळात भारतीय जनता पार्टीचा एक कार्यकर्ता म्हणून काम करीत असताना माझ्यावर विविध आंदोलनाचे किमान १०० गुन्हे दाखल झाले आहेत. मी सामान्य शेतकरी कुटुंबातून शहरात नोकरी निमित्त आलो. पक्षाने मला विविध पदांवर काम करण्याची संधी दिली तसेच २०१४ मध्ये विधानसभा लढण्याची देखील मला संधी मिळाली. पक्षाच्या विविध प्रदेशाध्यक्षांबरोबर मला काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी पक्षाच्या सर्व नेत्यांचे आभार व्यक्त करतो.

**- एकनाथ पवार**



## भूमिका

**बहुसंख्याकवाद हा लोकशाहीचा आत्मा असला तरीही बहुसंख्या कुणाची हा प्रश्न महत्त्वाचा आहे. समस्यांच्या मुद्द्यांवर समुदायाचे एकत्रीकरण केले जाते की जात, धर्म या मुद्द्यांवर याचे उत्तर आपल्याला लोकशाहीच्या खऱ्या प्रारूपाकडे घेऊन जाते. 'बहुसंख्याकवादात काय चुकीचे आहे?' पंतप्रधानांना बहुतेक हाच प्रश्न विचारायचा होता.**

# बहुसंख्याकवाद; हिंदूंचा की बहुजनांचा?



राहुल गांधींनी कांशीराम यांच्या 'जिसकी जितनी संख्या भारी उतनी उसकी हिस्सेदारी' या घोषणेची आठवण करून दिली. त्याला हिंदू बहुसंख्याकवादाचा संदर्भ देत हे काँग्रेसवरच उलटू शकते, असे सुचविण्याचा प्रयत्न पंतप्रधान करत असल्याचे स्पष्टच दिसते. विपर्यास किंवा शाब्दिक खेळ काही वेळ बाजूला ठेवून या प्रश्नाचे उत्तर शोधणे महत्त्वाचे आहे. हा प्रश्न एखाद्या नव्या शाब्दिक खेळाखाली दडपून ठेवला जाता कामा नये. जातीआधारित जनगणनेचे इंडिया आघाडीकडून समर्थन आणि हिंदू वर्चस्ववादाच्या मुद्द्यावर भाजपकडून होणारा विरोध या दोन्हीच्या केंद्रस्थानी हाच प्रश्न आहे. म्हणूनच या प्रश्नावर काळजीपूर्वक विचार करून त्याचे थेट उत्तर शोधणे गरजेचे आहे.

या मुद्द्यावर दोन प्रकारे दावे केले जात आहेत. पहिला आहे दोन प्रकारच्या अस्मितावादी राजकारणांसंदर्भात. एक आहे जातीआधारित आणि दुसरा धर्मावर आधारित. असे असेल तर एका प्रकारचे अस्मितावादी राजकारण दुसऱ्या प्रकारच्या अस्मितावादी राजकारणापेक्षा चांगले असे कसे म्हणता येईल? आपण धर्मवादाला विरोध करत असूत तर आपण जातीवादाला पाठिंबा कसा देणार? तर दुसरा दावा दोन प्रकारच्या बहुसंख्यवादी मुद्द्यांसंदर्भात आहे. त्यातला एक आहे अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या म्हणजेच बहुजनांच्या संख्येमुळे असलेल्या प्राबल्याबाबत तर दुसरा हिंदूंवर आधारित आहे. हिंदू बहुसंख्यवादामुळे लोकशाहीला धोका असेल तर बहुजन बहुसंख्यवादामुळे तो नाही असे कसे म्हणता येईल? पहिला प्रश्न आहे अस्मितावादी राजकारणाचा. तो उदारमतवादी आणि पुरोगामी विचारवंतांना दीर्घकाळ सतावत आहे. त्यांच्या मते समस्या, हितसंबंध या मुद्द्यांवर लोकांना एकत्र आणायला काहीच हरकत नाही. पण, केवळ जन्माच्या आधारे त्यांना जी जात मिळते, ज्यात त्यांचे काहीच कर्तृत्व नसते, त्या जातीच्या आधारे त्यांची अस्मिता चेतवून त्यांना एकत्र आणणे धोक्याचे आहे. बाटलीमधले भूत एकदा बाहेर काढले तर ते पुन्हा बाटलीत ठेवणे अशक्य होते. थोडक्यात सांगायचे तर मंदिराच्या राजकारणाइतकेच मंडलचे राजकारणही वाईट आहे. एकाला पाठिंबा द्यायचा आणि दुसऱ्याला विरोध करायचा हा राजकीय संधिसाधूपणा आहे. वगैरे. 'अस्मितावादी राजकारण' ही काही राजकीय विकृती म्हणता येणार नाही. आहेत त्या अस्मितांवर लक्ष केंद्रित करणे किंवा नवीन अस्मिता तयार करणे हे लोकशाही राजकारणाचे सार आहे. ते केवळ जात-धर्म किंवा वंश या मुद्द्यांवर लोकांना गोळा करण्यासाठी लागू होत नाही; तर स्त्रिया, प्रदेश किंवा देशांच्या बाबतीतही लागू होते. राजकारण म्हणजे लोकांना त्यांच्या सामूहिकतेची ओळख करून देणे. यात नव्या सीमारेषा आखणे आणि नव्यांचा समावेश करणे हे सतत सुरू असते. हे दलित किंवा हिंदूंच्या राजकीय एकत्रीकरणाला जेवढे लागू होते तेवढेच शेतकरी किंवा विद्यार्थ्यांना एकत्रित करण्याच्या प्रयत्नांनाही लागू होते. त्यामुळे प्रश्न अस्मितावादी राजकारणाचा नाही, तर समूहाला तुम्ही कोणत्या मुद्द्यांवर एकत्र करता त्याच्या स्वरूपाचा आणि संदर्भाचा आहे. माणसामाणसांमध्ये भेदभाव निर्माण करणाऱ्या, ते वाढावेत यासाठी द्वेषाचे इंधन वापरणाऱ्या, हिंसाचार घडवू शकणाऱ्या कोणत्याही अस्मितेच्या राजकारणापासून आपण सावध असले पाहिजे. भारतात इतर कोणत्याही अस्मितेच्या राजकारणापेक्षा धार्मिक अस्मितेच्या मुद्द्यावर केली जाणारी राजकीय जमवाजमव अत्यंत धोकादायक ठरते. अत्यंत धार्मिक समाजात, धार्मिक समुदायांमधील विभाजन खूप तीव्र असते. धार्मिक विभाजनाचा इतिहास, फाळणीमधली हिंसा आणि त्यानंतरच्या दंगलींचा इतिहास पाहता, धार्मिक धर्तीवरच्या कोणत्याही जमवाजमवीमध्ये हिंसाचाराचा धोका असतो.

## संपादकीय »

# नवी भरारी

***भारतीय अंतराळ स्थानक स्थापन करणे आणि 2040 पर्यंत चंद्रावर पहिला भारतीय पाठविण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित केले आहे.***

अंतराळ संशोधन विभाग चंद्रावरील स्थितीच्या अभ्यासासाठी एक आराखडा विकसित करणार आहे. यामध्ये चांद्रयान मोहिमांची मालिका, नेक्स्ट जनरेशन लाँच व्हेईकल विकसित करणे, नवीन प्रक्षेपण पॅडचे बांधकाम, मानवकेंद्रित प्रयोगशाळा स्थापन करणे आणि संबंधित तंत्रज्ञान यांचा समावेश असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत भारताच्या अंतराळ संशोधन क्षेत्रातील प्रयत्नांना बळ देण्याचा निर्धार करण्यात आला. या आव्हानात्मक क्षेत्रात एकेक नवे शिखर पादाक्रांत करीत आजघडीला भारत अग्रभागी पोहोचला आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये अंतराळात जी काही उड्डाणे घेतली ती भारतानेच. भविष्यातील अनेक अंतराळ योजनांवर भारताकडून चाललेले काम जागतिक पातळीवरील उल्लेखनीय ठरत आहे. इस्रोचे तत्कालीन प्रमुख डॉ. के. सिवन यांनी चार वर्षांपूर्वी भारतीय अंतराळ संशोधन केंद्राबाबत तसेच चंद्रावर पहिला भारतीय पाठविण्याचे सूतोवाच केले.

**काँग्रेसमध्ये खरं तर तीनच तारांकित प्रचारक आहेत. राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे. तिघांच्याही प्रचार सभांना प्रचंड गर्दी होऊ लागलेली आहे. काँग्रेसचं अजून तिकीटवाटपही झालेलं नाही, पण प्रचाराचा नारळ फुटलेला आहे. राजस्थानमध्ये खरगेंनी जाहीर सभा घेऊन प्रचाराला सुरुवात केली. राहुल गांधींनी मिझोरमपासून प्रचार सुरू केला.**

# चांदनी चौकातून: तारांकित प्रचारक

सोनिया गांधी प्रचारात उतरण्याची शक्यता नसली तरी, प्रत्येक राज्यात नेत्यांच्या एका तरी संयुक्त सभेला त्या उपस्थित राहू शकतील. कर्नाटकच्या विजयानंतर राहुल गांधी व प्रियंका गांधी लोकांना सभेसाठी खेचून आणत असल्याचं दिसत आहे. राहुल गांधींप्रमाणे प्रियंका गांधींनाही तितकाच प्रतिसाद मिळू लागला आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीसाठी प्रियंका गांधी-वाड्रा यांनीच पहिली सभा घेतली. कर्नाटकचे निकाल आल्यानंतर दोन दिवसांनी प्रियंका गांधी यांनी तेलंगणामध्ये जाहीर सभा घेऊन पक्षामध्ये उत्साहाचं वातावरण निर्माण केलं होतं. उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत प्रियंका यांनी एकहाती प्रचार केला, पण काँग्रेसचा दारुण पराभव झाला. त्यामुळं त्यांच्याकडं प्रचाराची धुरा देण्याबाबत पक्ष साशंक होता. हिमाचल प्रदेशमध्ये फक्त प्रियंका गांधींनी प्रचार केला होता. तिथं काँग्रेसचं सरकार आलं. त्यामुळं चित्र बदललं. आता प्रियंका गांधी



यांचे पाचही राज्यांमध्ये अधिकाधिक दौरे आखण्याचं पक्षानं ठरवलेलं आहे. प्रियंका गांधींना आत्ता उत्तर प्रदेशपुरतं सीमित राहायचं नाही. त्यांना पक्षामध्ये अधिक व्यापक भूमिका बजावायची आहे. त्यांच्याकडं सध्या उत्तर प्रदेशची जबाबदारी असली तरी, त्यांच्याकडं महासचिव म्हणून उत्तर प्रदेश देण्यात आलेलं नाही. कार्यकारिणीमध्ये बदल करताना महासचिवांकडं एकेक राज्य सोपवण्यात आलं होतं. पण, त्यामध्ये प्रियंका गांधींचा समावेश करण्यात आला नाही. दोन्ही गांधींना पक्षामध्ये प्रत्यक्ष पद न घेता पक्षाची धुरा सांभाळायची असावी. प्रियंका गांधी यांच्या सभांना गर्दी होत असेल तर निदान पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका होईपर्यंत तरी त्या तारांकित प्रचारक असतील. त्यानंतर त्या पक्षात कोणत्या भूमिकेत असतील हे ठरेल. राजस्थान भाजपमध्ये अंतर्गत वाद टोकाला गेला असला तरी, त्याचा काँग्रेसला लाभ मिळेलच असं नाही. काँग्रेसही समाजमाध्यमाच्या खेळात तरबेज झाल्यामुळं राजस्थानमध्ये काँग्रेस जिंकण्याची शक्यता असल्याचं चित्र निर्माण झालेलं आहे. भाजपप्रमाणे राजस्थान काँग्रेसमध्ये जबरदस्त रस्सीखेच सुरू झालेली आहे. आत्ताच्या घडीला मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्याइतका मुरब्बी नेताच काँग्रेसमध्ये नाही. गेहलोत सलग दोन दिवस सचिन पायलट यांच्यावर हल्लाबोल करत आहेत, पण पायलटांच्या तोंडून एक शब्दही निघालेला नाही. गेहलोत थेट काँग्रेसच्या मुख्यालयात बसून तासभर तलवारबाजी करत होते पण, शेजारी बसलेले प्रवक्ते पवन खेरा यांना गेहलोतांच्या विनोदावर हसण्याशिवाय काही करता आले नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# टोकाचं पाऊल उचलू नका!

## » मुख्यमंत्री शिंदेंचं मराठा बांधवांना आवाहन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा कुटुंबातील मुलांनी आत्महत्या करणं आमच्यासाठी दु:ख देणारी वेदणा देणारी घटना आहे. आत्महत्या झाल्या आहेत त्या दुर्दैवी आहेत. महाराष्ट्र सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी कटीबद्ध आहे, सर्व प्रयत्न करत आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकार मध्ये आरक्षण दिलं होतं, ते हायकोर्टात टिकलं, सुप्रीम कोर्टात ते टिकलं नाही.**



आम्हाला काही बाबी सुप्रीम कोर्टात मांडता आल्या नाहीत. काही त्रुटी होत्या, मराठा समाज मागास असल्याचं सिद्ध करायला अपयश आलं. आम्ही क्युरेटिव्ह पिटीशन दाखल केलेली आहे. आम्ही क्युरेटिव्ह पिटीशन ऐकतो, असं सुप्रीम कोर्टानं म्हटलं आहे, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीशांसमोर आपले तज्ज्ञ वकील पुरावे सादर करतील. मराठा आरक्षण मिळण्यासाठी एक मोठी संधी निर्माण झालेली आहे. मराठवाड्यातील कुणबी नोंदी असणारांना दाखले देण्यासाठी न्यायमूर्ती शिंदे समिती काम करत आहे. त्याचं देखील युद्ध पातळीवर काम सुरु आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. मराठा बांधवांना आवाहन करतो की टोकाचं पाऊल उचलू नका. मराठा समाजातील तरुणांचा जीव इतका स्वस्त आहे का? आपल्या कुटुंबाचा विचार केला आहे. राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी कटीबद्ध आहे, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. मराठा समाजाला सारथी आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाकडून लाभ दिले जातात त्याची माहिती देण्यासाठी मराठवाड्यात शिबीरं घेत आहेत. मराठा समाजाच्या बांधवांना मी आवाहन करतो, की मी कुणालाही खोटं आश्वासन दिलेलं नाही, मी कुणाची फसवणूक केलेली नाही. मी राजकीय आयुष्यात जे बोललो ते केलेलं आहे. मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणारं

### आत्महत्येच्या घटना ह्या दुर्दैवी

» मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य शासन करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. यावेळी ते म्हणाले, मराठा समाजातील तरुणांच्या आत्महत्येच्या घटना ह्या दुर्दैवी आणि दु:खदायक, वेदनादायी आहेत. माझी विनंती आहे की समाजातल्या माझ्या भावांनो टोकाचे पाऊल उचलू नका. बंधूंनो आपला जीव लाख मोलाचा आहे. आपल्या कुटुंबाचा, आई वडिलांचा, मुला बाळांचा विचार करा, अशी भावनिक साद देतानाच राज्य शासन मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी प्रयत्न करीत असल्याची ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

आरक्षण द्यायची जबाबदारी घेतलेली आहे. आमचं सरकार पूर्णपणे मराठा समाजाच्या बाजूचं आहे, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. कुणीही टोकाचं पाऊल उचलू नका, आई वडिलांचा, मुला बाळांचा विचार करा, तुमची तुमच्या कुटुंबाला गरज आहे. आरक्षण मिळवून देण्यासाठी सरकार बांधील आहे. अधिसंख्य पदं देण्यासाठी मी पुढं आलो होतो. अडीच ते चार हजार विद्यार्थी काम करत आहेत. जे जे लाभ द्यायचे आहेत ते युद्ध पातळीवर कसे मिळतील यासाठी सरकारनं निर्णय घेतलेला आहे. टोकाचं पाऊल उचलू नका, ते समाजाला आणि परिवाराला न परवडणारं आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्याचा शब्द मी दिला आहे. त्यामुळे माझ्या भावांनो आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नका. कुटुंबासाठी तुम्ही लाखमोलाचे आहात, असे भावनिक आवाहन करतानाच राज्य सरकार मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत बसणारे आणि टिकणारे आरक्षण देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (दि. २२) ठाणे येथे सांगितले.

# अनिल परबांचं शिंदे गटाला आव्हान!

## » शिवसेनेची खरी ताकद आम्ही दाखवू

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेनेचा ( ठाकरे गट) दसरा मेळावा शिवाजी पार्कवर पार पडणार आहे. तर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा दसरा मेळावा आझाद मैदानावर होणार आहे. दसरा मेळाव्याच्या निमित्तानं दोन्ही गटांकडून शक्तीप्रदर्शन करण्यात येणार आहे.**




त्याच पार्श्वभूमीवर शिंदे गटातून मुंबईत मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी करण्यात आली आहे. यावरून शिवसेना ( ठाकरे गट ) आमदार अनिल परब यांनी शिंदे गटाला थेट आव्हान दिलं आहे. शिंदे गटानं मेळाव्याच्या माध्यमातून ताकद दाखवावी.

शिवसेनेची खरी ताकद आम्ही दाखवू. ताकदच बघायची असेल, तर निवडणुका घ्या," असं विधान अनिल परबांनी केलं आहे. ते शिवसेना भवनाबाहेर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. अनिल परब म्हणाले, "आझाद मैदानावर 'इव्हेंट' होणार आहे. तर, शिवाजी पार्कवर दसरा मेळावा पार पडणार आहे. आमच्या दसरा मेळाव्याला परंपरा आहे. शिवसेना स्थापनेपासून ठाकरे घराण्याची ही परंपरा आहे. प्रत्येकवर्षी ही गर्दी वाढत आहे. त्यामुळे यंदा किती वाढेल? हे आता सांगणं कठीण आहे. शिवसेना ही मर्दांची सेना असल्याचं बाळासाहेब ठाकरेंनी आम्हाला सांगितलं होतं. मर्द गद्दारांबरोबर गेले नाहीत.

कुठल्याही यंत्रणेसमोर झुकले नाहीत. ज्यांनी सगळी आमिषे फेटाळून लावली, अशांचा हा मेळावा आहे," असं अनिल परबांनी सांगितलं. शिंदे गटाला मेळावा घेण्याचा अधिकार आहे. त्यांनी त्यांची ताकद दाखवावी. शिवसेनेची खरी ताकद आम्ही दाखवू. ताकदच बघायची असेल, तर निवडणुका घ्या... काय ते एकदा ताकद दाखवा," असं आव्हान अनिल परबांनी शिंदे गटाला दिलं आहे.

# मुंबईत प्रदूषण मापनात तफावत!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

मुंबईतील प्रदूषणाच्या परिस्थितीची आकडेवारी केंद्र सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या सफर या प्रणालीद्वारे तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या यंत्रणेद्वारे उपलब्ध होते. या दोन्ही प्रणालींद्वारे उपलब्ध होणाऱ्या आकडेवारीमध्ये तफावत आढळते.

या पार्श्वभूमीवर सफरची स्थळे निश्चित निकषाने स्थापित करण्यात आलेली नसून त्याची दैनंदिन देखभालही होत नसल्याचे सांगत जोपर्यंत आकडेवारीत ताळमेळ होत नाही तोपर्यंत ही केंद्रे बंद करावीत, अशी सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) आणि मुंबई महापालिकेला केली आहे. यासंदर्भात गुरुवारी पत्र लिहिण्यात आले आहे. मुंबईमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे एकूण १४ ठिकाणी प्रदूषण मापक तपासणी यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे.

या व्यतिरिक्त केंद्र सरकारच्या सफरची ९ केंद्रे मुंबईत आहेत. या केंद्रातून अद्ययावत माहिती एमपीसीबी आणि सीपीसीबीच्या संकेतस्थळावर उपलब्ध होते. मात्र सफरची स्थळे निश्चित निकषाने स्थापित करण्यात आलेली नाहीत असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सहसंचालक व्ही. एम. मोटघरे यांनी सांगितले.

# भारताची पॅलेस्टाईनला मदत!

## पॅलेस्टाईनसाठी पाठविले 6.5 टन वैद्यकीय साहित्य!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गाझा पट्टीवरून हमास या दहशतवादी संघटनेने इस्रायलवर हल्ला केल्यानंतर इस्रायलकडून गाझा पट्टी सील करण्यात आली होती. तसंच, तिथं इंधन, पाण्यासह इतर मानवतावादी साहित्यांचीही नाकाबंदी करण्यात आली होती. त्यामुळे गाझा पट्टीत राहणाऱ्या नागरिकांचा जगण्याची संघर्ष सुरू होता. अखेर, शनिवारी इजिप्त आणि गाझा पट्टी दरम्यानची सीमा इस्रायलने दोन आठवड्यांनंतर खुली केली. त्यामुळे युद्धग्रस्त पॅलेस्टिनी नागरिकांसाठी अत्यंत आवश्यक अशा मदत सामुग्रीची वाहने गाझा पट्टीत दाखल झाली आहेत.**




आता, भारतानेही गाझा पट्टीतील पॅलेस्टाईन नागरिकांना मदत पाठवली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी याबाबत X या समाजमाध्यमावरून माहिती दिली.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची X वर म्हणाले की, पॅलेस्टाईन नागरिकांसाठी ६.५ टन वैद्यकीय साहित्य आणि ३२ टन आपत्ती निवारण साहित्य IAF C-17 या विमानाने रवाना करण्यात आली आहेत. हे विमान इजिप्तच्या EL-ARISH या विमानतळावर पोहोचेल. औषधे, शस्त्रक्रियेसाठी लागणारी साधने, तात्पुरत्या राहण्यासाठी तंबू, ताडपत्री, स्वच्छतेसाठी लागणाऱ्या वस्तू, जलशुद्धीकरण गोळ्यांसह विविध वस्तू पॅलेस्टाईन नागरिकांसाठी पाठवण्यात आल्या आहेत. इंधनासह सर्व साहित्यांच्या गाड्यांना सीमेवरच अडवण्यात आल्याने गाझातील नागरिकांची कोंडी झाली होती. तेथील पॅलेस्टाईन नागरिकांचा जीवन-मरणाशी संघर्ष सुरू होता. गाझा पट्टी आणि इजिप्तमधील सीमेवर आधीपासूनच संयुक्त राष्ट्राने पाठवलेल्या सुमारे तीन हजार टन मदतसामुग्रीचे ट्रक उभे होते. शनिवारी ही सीमा खुली झाल्यावर हे ट्रक गाझाच्या दिशेने निघाले. सध्याच्या युद्धग्रस्त गाझातून सुटका करून घेण्यासाठी हजारो नागरिक इजिप्तमध्ये जाण्याच्या प्रतीक्षेत सीमेवर आहेत. मदत सामुग्रीच्या २० वाहनांना प्रथम इजिप्त सीमेवरून इस्रायलने वेढा दिलेल्या गाझा पट्टीत प्रवेश देण्यात आला असून या वाहनांमध्ये जीवरक्षक साहित्याचा समावेश असल्याचे संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे. इजिप्त आणि गाझा पट्टी दरम्यानची सीमा इस्रायलने सुरू केल्यानंतर पॅलेस्टाईन नागरिकांसाठी मदतीचा ओघ वाढू लागला आहे. परंतु, आतापर्यंत मिळालेली मदत अपुरी असल्याचं समोर येतंय.तर दुसरीकडे ही मदत सामुग्री गाझामधील मानवी संकटाच्या तीव्रतेच्या तुलनेत तुटपुंजी असल्याचे मदत पथकांतील स्वयंसेवकांनी सांगितले. त्यामुळे आता भारतानेही मदत पाठवली आहे. गाझामध्ये २३ लाख पॅलेस्टिनी रहिवासी आहेत. त्यांच्यापैकी निम्म्यांनी दक्षिणेकडे स्थलांतर केले आहे. उर्वरित लोक अन्नधान्य पुरवून खात असून अशुद्ध पाणी पीऊन दिवस ढकलत आहेत. तर गाझातील रुग्णालयांमध्ये वैद्यकीय सामग्रीचा आणि जनित्रांसाठी इंधनाचा तुटवडा असल्याचे रुग्णालय सूत्रांनी सांगितले.

### इस्रायलने केली होती नाकाबंदी

इंधनासह सर्व साहित्यांच्या गाड्यांना सीमेवरच अडवण्यात आल्याने गाझातील नागरिकांची कोंडी झाली होती. तेथील पॅलेस्टाईन नागरिकांचा जीवन-मरणाशी संघर्ष सुरू होता. गाझा पट्टी आणि इजिप्तमधील सीमेवर आधीपासूनच संयुक्त राष्ट्राने पाठवलेल्या सुमारे तीन हजार टन मदतसामुग्रीचे ट्रक उभे होते. सध्याच्या युद्धग्रस्त गाझातून सुटका करून घेण्यासाठी हजारो नागरिक इजिप्तमध्ये जाण्याच्या प्रतीक्षेत सीमेवर आहेत. मदत सामुग्रीच्या २० वाहनांना प्रथम इजिप्त सीमेवरून इस्रायलने वेढा दिलेल्या गाझा पट्टीत प्रवेश देण्यात आला असून या वाहनांमध्ये जीवरक्षक साहित्याचा समावेश असल्याचे संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे.


# नेपाळमध्ये 6.1 रिश्टर स्केलचा भूकंप


## दिल्लीपासून बिहारपर्यंत भूकंपाचे धक्के

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नेपाळची राजधानी काठमांडू येथे रविवारी सकाळी ७.३९ वाजता ६.१ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. धाडिंग जिल्ह्यात भूकंपाचा केंद्रबिंदू होता. भूकंपामुळे कोणताही मृत्यू किंवा जखमी झाल्याचे वृत्त नाही. बागमतीसह गंडकी प्रांतातील इतर जिल्ह्यांमध्येही हा धक्का जाणवला. तर भारतात दिल्लीपासून बिहारपर्यंत भूकंपाचे धक्के जाणवले. पाटणा, बगाहा, छपरा, सिवान आणि गोपालगंजमध्ये भूकंपाचे धक्के अधिक जाणवले. लोक घाईघाईने घराबाहेर पडले.**





नेपाळमध्ये भूकंप सामान्य आहेत, जे तिबेटी आणि भारतीय टेक्टोनिक प्लेट्स एकमेकांच्या जवळ येतात आणि दर 100 वर्षांनी सुमारे दोन मीटरने एकमेकांच्या जवळ जातात, ज्यामुळे भूकंप होतात, दबाव निर्माण होतो. ऑक्टोबर महिन्यात येथे भूकंपाची ही पाचवी घटना आहे. 5 ऑक्टोबर रोजी नेपाळमध्ये एका तासात चार भूकंप झाले. 4.6 रिश्टर स्केलचा पहिला भूकंप पश्चिम नेपाळमध्ये 2:25 वाजता 10 किलोमीटर खोलीवर आला, त्यानंतर दुपारी 2:51 वाजता 6.2 रिश्टर स्केलचा भूकंप झाला, असे नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी (NCS) च्या अधिकाऱ्याने सांगितले. 3.6 आणि 3.1 रिश्टर स्केलचे आणखी दोन भूकंप दुपारी 3:06 आणि 3:19 वाजता झाले. भूकंपामुळे नेपाळमधील बझांगमध्ये अनेक कच्चा घरे कोसळली. आपल्या पृथ्वीचा पृष्ठभाग प्रामुख्याने 7 मोठ्या आणि अनेक लहान टेक्टोनिक प्लेट्सपासून बनलेला आहे. या प्लेट्स सतत तरंगत राहतात आणि कधीकधी एकमेकांवर आदळतात. अनेक वेळा टक्कर झाल्यामुळे जास्त दाब येतो तेव्हा या प्लेट्स तुटू लागतात. अशा स्थितीत खालून बाहेर पडणारी ऊर्जा बाहेर पडण्याचा मार्ग शोधते आणि भूकंप होतो. तीव्रतेच्या दृष्टीने आतापर्यंतचा सर्वात धोकादायक भूकंप 22 मे 1960 रोजी चिलीमध्ये झाला होता. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ९.५ इतकी होती. यामुळे आलेल्या त्सुनामीने दक्षिण चिली, हवाई बेट, जपान, फिलीपिन्स, पूर्व न्यूझीलंड, दक्षिण-पूर्व ऑस्ट्रेलियासह अनेक देशांमध्ये भयंकर विध्वंस घडवून आणला. यामध्ये 1655 लोकांचा मृत्यू झाला, तर 3000 लोक जखमी झाले. सर्वात प्राणघातक भूकंप 1556 मध्ये चीनमध्ये झाला होता, ज्यामध्ये 8.30 लाख लोकांचा मृत्यू झाला होता. या वर्षाच्या सुरुवातीला तुर्कीमध्ये विनाशकारी भूकंप झाला होता. यामध्ये हजारो लोकांना आपले प्राण गमवावे लागले.

# पंजाबात बागेश्वर बाबांच्या वक्तव्याने वाद

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



बागेश्वर धामचे बाबा धीरेंद्र शास्त्री यांनी पंजाबमधील एका कार्यक्रमादरम्यान पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केले आहे. पठाणकोटमध्ये सुरू असलेल्या कार्यक्रमात त्यांनी ख्रिश्चन बांधवाची तुलना विदेशी शक्तींशी केली. ते म्हणाले की, ख्रिश्चनांनी गुरुद्वारा, मंदिरे आणि हिंदू धर्मातील लोकांची दिशाभूल करू नये, म्हणून ते सर्वत्र प्रचार करण्यासाठी पोहोचतात.

ज्यानंतर ख्रिश्चन बांधवानी त्यांना इशारा दिला आहे. बाबा धीरेंद्र शास्त्री यांनी आपल्या वक्तव्याबद्दल माफी मागावी, अन्यथा पठाणकोटमध्ये जमाव जमवून निदर्शने करण्यात येतील, असे ख्रिश्चन बांधवांनी स्पष्ट केले आहे. धीरेंद्र शास्त्री कालपासून पंजाबमध्ये आहेत. सकाळी ते अमृतसरला पोहोचले आणि सुवर्ण मंदिर आणि दुर्ग्यान तीर्थ येथे नतमस्तक झाले. येथे त्यांनी भारत हिंदू राष्ट्र होण्याबाबतही सांगितले. ख्रिश्चन समाजाने बाबा धीरेंद्र शास्त्री यांना आपले शब्द मागे घेऊन माफी मागण्यास सांगितले आहे. यासोबतच बाबा धीरेंद्र शास्त्री यांनी माफी न मागितल्यास पठाणकोटमध्ये त्यांच्याविरोधात निदर्शने करण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला आहे. ख्रिश्चन बांधव मोठ्या संख्येने येऊन धरणे आंदोलन करणार आहेत. यासोबतच बंधुभावानेही समाजाला परस्पर आदर राखण्याचे आदेश दिले आहेत.



# नवरात्रीचा नववा दिवस सिद्धिदात्री देवीचा!

महानवमीच्या दिवशी माँ दुर्गेचे नववे रूप माता सिद्धिदात्रीची पूजा केली जाते. नवमी तिथीशी संबंधित खास गोष्टी-
माँ दुर्गाला समर्पित नवरात्रीचा पवित्र सण नवमी तिथीपासून संपेल. नवरात्रीच्या नवमीला माँ दुर्गेचे नववे रूप माँ सिद्धिदात्रीची पूजा केली जाते. असे मानले जाते की माता सिद्धिदात्री भक्तांच्या मनोकामना पूर्ण करते आणि भक्तांना कीर्ती, शक्ती आणि धन देखील प्रदान करते. शास्त्रात सिद्धिदात्री आईला सिद्धी आणि मोक्षाची देवी मानण्यात आली आहे. जर आपण माता सिद्धिदात्रीच्या रूपाबद्दल बोललो तर ती माता राणी महालक्ष्मीच्या कमळावर विराजमान आहे. आईला चार हात आहेत. आईने हातात शंख, गदा, कमळाचे फूल आणि चकती घेतली आहे. माता सिद्धिदात्री हे देखील माता सरस्वतीचे रूप मानले जाते. नवमी तिथीला मुलींची पूजा करण्याचीही परंपरा आहे. असे मानले जाते की नवमीच्या दिवशी कन्येची पूजा केल्याने व्यक्तीला शुभ फल प्राप्त होते.

# बीस सालका इतिहास बदला!

## » भारताचा न्यूझीलंडवर चार गडी राखून विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलियावरील विजयानंतर वीरेंद्र सेहवागने विराट कोहलीच्या कौतुकासाठी केलेले हे ट्विट रविवारी पुन्हा एकदा खरे ठरले. विश्वचषकात सलग चार सामने जिंकणाऱ्या न्यूझीलंडविरुध्दच्या सामन्यात भारताचे धुरंधर एका बाजूने बाद होत असताना विराट कोहली पहाडासारखा दुसऱ्या बाजूला उभा राहिला. नुसता उभाच नाही राहिला तर त्याने राम लक्ष्मणाला खांद्यावर घेवून समुद्रलंघन करणाऱ्या हनुमानाप्रमाणे संघाच्या विजयाची जबाबदारी स्वत:च्या खांद्यावर पेलली. भारताला विश्वचषकातील न्यूझीलंडवर 20 वर्षानंतर पहिला विजय मिळाला.**

डॅरेल मिचेलच्या तुफानी शतकानंतर भारतीय गोलंदाजांनी केलेल्या भेदक माऱ्यामुळे न्यूझीलंडला 50 षटकांत 273 धावांपर्यंतच मजल मारता आली. मोहम्मद शमीने आज मिळालेल्या संधीचे सोने केले आणि पाच विकेटस् घेत आपली निवड सार्थ ठरवली. न्यूझीलंडकडून डॅरेल मिचेलने 130 तर रचिन रवींद्रने 75 धावा केल्या. हे आव्हान भारताने 48 षटकांत 4 विकेटस आणि 12 चेंडू शिल्लक ठेवून गाठले. विराट कोहलीने 95, रोहित शर्माने 46 धावा केल्या. न्यूझीलंडच्या 274 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना रोहित शर्मा आणि शुभमन गिल या जोडीने नेहमीच्या स्टाईलने आक्रमक सुरुवात केली. त्यांनी किवी गोलंदाजांच्या वेगाचा वापर करीत टायमिंगवर अचूक फटके मारत धावा गोळा केल्या. पॉवरप्लेमध्ये संघाच्या बिनबाद 63 धावा झाल्या होत्या. ट्रेंट बोल्ट, मॅट हेन्री, मिशेल सँटनेर अपयशी ठरल्यानंतर ही जोडी फोडण्यासाठी कर्णधाराने लॉकी फर्ग्युसनच्या हाती चेंडू दिला. त्याने आपले काम चोख बजावले. आधी रोहितचा त्रिफळा उडवून फर्ग्युसनने गिलला थर्डमॅनच्या जाळ्यात अडकवले. रोहितने 46 तर गिलने 26 धावा केल्या. यानंतर श्रेयस अय्यर आणि विराट कोहलीने डावाची सूत्रे हाती घेतली. श्रेयस चांगल्या टचमध्ये आहे असे वाटत होते, परंतु ट्रेंट बोल्टने श्रेयसची कमजोरी ओळखून त्याला बाउन्सर टाकला आणि डिप स्क्वेअर लेगवर मिचेलने त्याचा झेल घेतला. यानंतर जमलेली विराट कोहली आणि के.एल. राहुलची जोडी गेल्या सामन्याप्रमाणे या सामन्यातही विजय मिळवून देइल असे वाटत असताना सँटनेरच्या अचूक डिआरएसने राहुलचा (27) बळी घेतला. हार्दिक पंड्याच्या जागी संधी मिळालेला सूर्यकुमार 2 धावांवर धावचित होवून तंबूत परतला. दरम्यान चेसमास्टर विराट कोहली एका बाजूला आपली ड्युटी शांतपणे बजावत होता.



### जडेजाने विजयी चौकार ठोकला

» एरव्ही सरासरी 40 चेंडूच्या आत अर्धशतक गाठणाऱ्या विराटने यावेळी तब्बल 60 चेंडूत अर्धशतक गाठले. त्याला रवींद्र जडेजा साथ देत होता. विराट, जडेजाने विजय जवळ आणला, तसे विराटचे शतकही जवळ आले. बांगलादेशविरुध्दच्या सामन्याप्रमाणे शतक आणि विजय यांच्यात रेस लागली. जडेजाने त्याला साथ दिली. शतकाला 5 धावा कमी असताना षटकार ठोकू सामना संपवायचा आणि शतकही गाठायचे असे ठरवून त्याने हेन्रीचा चेंडू फटकावला. परंतु तो सीमारेषा पार न करता ग्लेन फिलिप्सच्या हातात विसावला. भारताच्या विजयाचा गड सर करणारा सिंह मात्र 95 धावांवर बाद झाला. यानंतर जडेजाने वेळ न दबडता विजयी चौकार ठोकला.

# 'तो' पराभव धोनीच्या जिव्हारी लागला!

## » धोनीसोबत हार्दिकलाही अश्रू अनावर

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**यंदाच्या वन-डे विश्वचषक स्पर्धेत टीम इंडियाचे दमदार प्रदर्शन सुरु आहे. भारताने या स्पर्धेतील सलग चार सामने जिंकले आहेत. मात्र गत विश्वचषक स्पर्धेत भारताचा प्रवास उपांत्य फेरीतच संपुष्टात आला होता. न्यूझीलंड विरुद्धच्या सामन्यात माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी ( चड्ढ़ेपळ) धावबाद होताच टीम इंडियाच्या आशा संपुष्टात आल्या होत्या.**

त्या विश्वचषकादरम्यान भारतीय संघाचे फलंदाजी प्रशिक्षक असलेले संजय बांगर यांनी या सामन्यानंतर झालेल्या घटनेचा मोठा खुलासा केला आहे.




रविवारी (२२ ऑक्टोबर) भारत-न्यूझीलंड सामन्यावेळी त्यांना या घटनेचे स्मरण झाले. मागील विश्वचषक स्पर्धेत ११ जुलै २०१९ रोजी उपांत्य फेरीत न्यूझीलंड आणि भारत आमने-सामने होते. या सामन्यात माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी धावबाद होताच टीम इंडियाच्या आशा संपुष्टात आल्या. या सामन्याबाबत बोलताना बांगर म्हणाले की, गत विश्वचषकातील उपांत्य फेरीत पराभव लागला धोनीच्या जिव्हारी लागला. ड्रेसिंग रूममध्ये तो धाय मोकलून रडाला. धोनी बराच वेळ रडत राहिला. धोनीसोबत हार्दिक पांड्या आणि ऋषभ पंतही रडत होते.

उपांत्य फेरीतील पराभवानंतर धोनीचे अश्रू थांबत नव्हते. पंत आणि हार्दिकही ड्रेसिंग रूममध्ये ढसाढसा रडत होते. तो सामना धोनीच्या कारकिर्दीतील शेवटचा सामना ठरला. यानंतर धोनीने भारतीय संघाची जर्सी घातली नाही, असे बांगर म्हणाले. इंग्लंडमधील मँचेस्टरमध्ये प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंड संघाने ५० षटकांत आठ गडी गमावून २३९ धावा केल्या. पावसामुळे हा सामना दोन दिवसात पूर्ण झाला. खराब हवामान आणि पावसामुळे परिस्थिती वेगवान गोलंदाजांना अनुकूल होती.

न्यूझीलंडच्या खेळाडूंनी याचा फायदा घेत भारताच्या सहा विकेट्स ९२ धावांपर्यंत कमी केल्या. भारत मोठ्या पराभवाच्या जवळ होता. येथून धोनीने रवींद्र जडेजाच्या साथीने डावाला आकार दिला. धोनी आणि जडेजा यांनी सातव्या विकेटसाठी ११६ धावांची भागीदारी केली होती. संघाच्या २०८ धावांवर जडेजा बाद झाला. त्यानंतर ४९व्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर धोनी धावबाद झाला.

# पाकिस्तान संघाच्या वाढल्या अडचणी!

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

एकदिवसीय विश्वचषक २०२३ च्या स्पर्धेत पाकिस्तान क्रिकेट संघाची स्थिती सध्या चांगली दिसत नाहीये. बाबर अँड कंपनीसाठी स्पर्धेची सुरुवात चांगली झाली, मात्र गेल्या दोन सामन्यात संघाला सलग दोन पराभवाला सामोरे जावे लागले आहे. यामुळे संघ ४ गुणांसह गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. या स्पर्धेतील उपांत्य फेरीसाठी पात्र ठरणे पाकिस्तानसाठी सोपे असणार नाही. चला तर मग उपांत्य फेरीचे समीकरणाबद्दल जाणून घेऊया, ज्यानंतर पाकिस्तान अजूनही टॉप-४ मध्ये पात्र ठरू शकतो. बाबर आझमच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान क्रिकेट संघाने आतापर्यंत ४ सामने खेळले आहेत, ज्यामध्ये २ सामने जिंकले असून आणि दोनदा पराभवाला सामोरे जावे लागले आहे. ४ गुणांसह हा संघ गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. संघाचा नेट रनरेट मायनस (०.४५६) मध्ये आहे. अशा परिस्थितीत उपांत्य फेरीपर्यंतचा प्रवास संघासाठी सोपा असणार नाही. जरी पाकिस्तानला उपांत्य फेरी गाठणे अवघड असले, तरी ते अशक्य नाही.

सध्या संघाकडे ५ सामने शिल्लक आहेत. जर संघाने सर्व ५ सामने जिंकले, तर शेवटच्या ४ मध्ये पोहोचणे सोपे होईल. होय, १४ गुणांसह हे शक्य आहे, परंतु बाबर आणि कंपनीने एकही सामना गमावला तर कमी गुण होतील. अशा स्थितीत उपांत्य फेरी गाठण्यासाठी संघाला इतर संघांच्या विजय-पराजयावर अवलंबून राहावे लागणार आहे. तसेच, कोणताही सामना जिंकला तरी मोठ्या फरकाने जिंकण्याचा प्रयत्न केला पाहिजे.